प्रकरण दुसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील आशयसूत्रे

प्रकरण दुसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील आशयसूत्रे

प्रास्ताविक

१. कुटुंबसंस्थेचे चित्रण

२. मध्यमवर्गीय कुटुंब जीवनाचे चित्रण

३. नातेसंबंधाचे चित्रण

३.१ नातेसंबंधात स्त्रीची होणारी कुचंबणा

३.२ बदलत्या नातेसंबंधांचे चित्रण

४.ढासळती कुटुंब व्यवस्थेचे चित्रण

४.१ परदेशस्थ वातावरण : व्यक्तिकेंद्री मूल्ये व परंपरानिष्ठा यातील ताण

५.दोन पिढ्यातील अंतराचे चित्रण

६.बदलत्या सामाजिक स्थितीचे चित्रण

७.अपरिचित अनुभवविश्वाचे चित्रण

सारांश

प्रकरण : दुसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील आशयसूत्रे

१९६० नंतरच्या मराठी कथेचा आशय प्रयोगदृष्ट्या विविधांगी विस्तार झाला आहे. नवनव्या दिशांनी, नव्या शैलींनी लिहिणाऱ्या कथाकारांनी मराठी कथेच्या स्वरूपामध्ये अंतर्बाह्य भर टाकली. या कालखंडात स्त्रियांचे कथालेखनही वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९६० ते १९८० या दशकावर स्त्री कथाकारांचा वावरही लक्षणीय स्वरूपाचा आहे. नवे विषय, स्त्री-पुरुष नात्यांचे अनोखे चित्रण आणि नव्या पद्धतीची मांडणी या वैशिष्ट्यांनी कथालेखिकांनी आपल्या कथांकडे वाचकांना आकृष्ट केले. त्यामध्ये प्रामुख्याने वसुंधरा पटवर्धन, आशा बगे, सानिया, प्रिया तेंडुलकर, प्रतिमा इंगोले, वसुधा पाटील, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, मेघना पेठे, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, अरुणा सबाणे, सुमती क्षेत्रमाडे या कथालेखिका येतात.

१९८० नंतरच्या कालखंडात कथालेखन करणाऱ्या महत्त्वपूर्ण कथालेखिकांमध्ये मोनिका गजेंद्रगडकर यांचे नाव महत्त्वाचे आहे. गेल्या दशकभरात त्यांनी भिन्न-भिन्न आशयाच्या व रूपविशेषांच्या वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहिल्या.

मोनिका गजेंद्रगडकर या अलीकडच्या दशकभरात कथालेखन करणाऱ्या लेखिका. साधारणतः १९९५ पासून त्या कथा लिहीत आहेत. आपल्या कथालेखनाच्या निर्मितीविषयी त्या म्हणतात- *१९९५ सालापासून मी कथालेखन करीत आहे, सातत्यानं कथालेखनच करीत आहे. आपल्याला लेखन करता येतं हे मला मी जी सुरवातीला मुक्त पत्रकारिता केली त्यावरुन समजलं. पण स्वतःला माणूस म्हणून व्यक्त करणं म्हणजे काय, हे मात्र मला माझ्या कथांनी सांगितलं. स्वतःला जाणणं, आजमावणं याची नितांत गरज असते. स्वतःमध्ये डोकावून पाहण्याची, स्वतःशीच संवाद करण्याची एक उर्मी नि एक स्वतःबद्दलचा विश्वास*

माझ्या कथांनी माझ्यात रुजवत नेला. जसं बहुतेकांचं लेखन कवितेच्या माध्यमातून सुरू होतं तसंच माझंही झालं. पण सुदैवानं माझ्या लवकरच लक्षात आलं की, कविता लिहायला प्रतिभेचं सामर्थ्य अलौकिक पातळीवरचंच लागतं..... मी माझी पहिली कथा स्पर्श लिहिली. ती कथा होती की पाहिलेला अनुभवाचा वृत्तांत होता? मला समजलं नव्हतं, पण ती माझ्या दृष्टीनं मी लिहिलेली (अर्थात पूर्णतः फसलेली) कथाच होती, हे निश्चित नाही. (मोनिका गजेंद्रगडकर, जुऑस.२००८,३३) प्रस्तुत दीर्घ अशा अवतरणातून मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथाआरंभावर, निर्मितीवर प्रकाश पडतो. आत्मविष्कार, स्वतःला व्यक्त करणे ही आपल्या लेखनाची प्रेरणा त्या मानतात. लेखिकेच्या कथालेखनाच्या प्रवासात त्यांच्या संवेदनशील जाणिवेबरोबर त्यांच्यावर झालेले कौटुंबिक आणि वाङ्मयीन संस्कारही महत्त्वाचे होते.

मोनिका गजेंद्रगडकर यांचे वडील सुप्रसिद्ध कथालेखक विद्याधर पुंडलिक होत. त्यांच्या लेखनाचा संस्कार त्यांच्यावर होणे स्वाभाविकच होते. *परंतु त्यांच्याही कथा मला वडील या नात्यापेक्षा लेखिका या नात्याने भावलेल्या होत्या. पण अनुकरण वा नक्कल या लेखकांच्या कथांचे- माझ्याकडून झाले नाही* (मोनिका गजेंद्रगडकर, जुऑस.२००८.३५) अशी आपल्या कथालेखनाची निर्मिती प्रक्रिया सांगतात. नागर जीवनातील भिन्न-भिन्न स्तरांवरील व्यक्ती वेगवेगळ्या प्रसंगी कशी वागतात, त्या-त्या वेळी त्यांची मानसिकता कशी असते, त्यांचे कुटुंबाशी, समाजाशी नातेसंबंध कसे असतात, त्यांच्या जगण्यातील सुसंगती व विसंगती त्या आपल्या कथांमधून चित्रित करतात. त्यांच्या *भूप* आणि *आर्त* या दोन्ही संग्रहातील कथामधून त्यांच्या अनुभवांची व्यापकता आणि विचारांची सखोलता दिसून येते. या दोन्ही कथासंग्रहातील कथेचा रूपबंध *दीर्घ* स्वरूपाचा आहे. या दोन्ही संग्रहात प्रत्येकी सहा-सहा दीर्घकथा आहेत. त्यांच्या या कथा *साप्ताहिक सकाळ, मौज, कालनिर्णय सांस्कृतिक, मिळून साऱ्याजणी* यासारख्या दिवाळी अंकातून व मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांचा पहिला कथासंग्रह *भूप* २००४ ला प्रसिद्ध झाला तर *आर्त* हा दुसरा कथासंग्रह २००८ ला

प्रसिद्ध झाला. *भूप* हा संगीतातील एक राग आहे. मानवी जीवनाचा वेध घेऊन मनातील भावना व्यक्त करण्यासाठी संगीताचा, सुराचा वापर त्या आपल्या कथांतून करतात. *ज्याला राग म्हटले जाते, त्या रागामुळे नात्यांत भिंत उभी राहिलेली.. पण ही भिंत त्या रागामुळेच कोलमडून पडणारी* (अनिल बळेल, जाने,२००८) असे *भूप* चे विवेचन अनिल बळेल यांनी आपल्या लेखात केले आहे.

शहरी संस्कृतीतील मध्यमवर्गीय लोकांचे जीवनचित्रण त्यांच्या कथेमधून येते. नव्या औद्योगिक संस्कृतीने जन्माला घातलेले भोगवादी संस्कृतीच्या आवर्तात खेचल्या गेलेल्या समूहाची चित्रे लेखिकेने रेखाटली आहेत. नव्या वास्तवाने उभे केलेले प्रश्न, मानवी वर्तन-स्वभाव व्यक्तींच्या दुःखाला कारणीभूत ठरतात, याचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेतून येते. दोन पिढ्यातील जीवनविषयक धारणांमुळे मानवी नातेसंबंधात पडलेले अंतर, कुटुंबसंस्थेतील ताण या प्रकारची विविध आशयसूत्रे मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथामधून प्रकट होतात. अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

१. कुटुंबसंस्थेचे चित्रण :-

नव्या काळात आकारास आलेले कुटुंबजीवन, त्यातील गुंते यांचे भेदक चित्रण मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेत येते. माणसाने आपल्या गरजेनुसार माणसा-माणसाला जोडले जावे यासाठी नात्यांची निर्मिती केली आणि त्यातूनच कुटुंबसंस्थेचा जन्म झाला. विषमलिंगी स्त्री-पुरुष आणि त्यांची मुले यांनी मिळून कुटुंबाची निर्मिती होते. पण अलीकडची कुटुंबव्यवस्था विविध कारणाने ढासळत चाललेली दिसते. एकमेकांची सुख-दुःखे वाटून घेता यावीत, भावनांची, विचारांची देवाण-घेवाण करता यावी यासाठी विवाह संस्था जन्मते. आणि तिचे विकसीत रूप बनून कुटुंबसंस्था उभी राहते. पण औद्योगिक क्रांतीनंतर वरवरच्या सुखाकडे आकर्षित होत चाललेल्या माणसांचे जीवन, त्यांची वित्तलोलुप

भावना, सुखाच्या मागे धावणारे मानवी जीवन यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या परिणाम कुटुंबसंस्थेवरती झाला. हीच कारणे पुढे कुटुंबसंस्थेच्या खच्चीकरणाला जबाबदार ठरत गेली.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांतून या बदलत्या कुटुंब संस्थांचे प्रभावी चित्रण येते. भारतीय समाजातील मध्यमवर्गीय कुटुंबात कोणत्याही मोठमोठ्या अपेक्षा न ठेवता वाट्याला आलेले जीवन सुखरूप करण्याचा प्रयत्न या कुटुंबव्यवस्थेतील व्यक्ती करत असतात. आई-वडील आणि मुले यांच्याबरोबर कुटुंबातील आजुबाजुचा परिसर कथेतून येतो. औद्योगीकरणाने व अत्याधुनिक शिक्षणामुळे परदेशात स्थिर झालेली मुले, त्यांची तेथील संस्कृती आणि मूळ देशांतील त्यांचे आईवडील याचे चित्रण *अनोळखी* कथेमध्ये येते. कुटुंबातील पती-पत्नी यांना समान दर्जा असला पाहिजे; पण हे तत्व मोडीत निघाल्यामुळे कुटुंबाचे होणारे हाल *नाळ* कथेमध्ये येते. आई-वडील आणि त्यांची मुले असा त्रिकोण बऱ्याच कुटुंबामध्ये असतो. पण जेव्हा या त्रिकोणातील एक बाजू मोडली जाते तेव्हा कुटुंबाची घडी पूर्णपणे विस्कटली जाते, याचे चित्रण करणारी ही कथा आहे. दोन पिढ्यातील मतभेदामुळे कुटुंबात कसे ताण निर्माण होतात याचे चित्रण *भूप* आणि *संक्रमण* या कथा करतात. धार्मिक बाबतीतील आंधळी श्रद्धा माणसाला कशी पशूपातळीवर पोहचवते आणि त्यातून कुटुंबाला कसे तडे जातात याचे चित्रण *श्रध्दा* कथेतून येते.

कुटुंबसंस्था ही घरातील सद्स्याबद्दल असणारी आपुलकी, काळजी यामुळे बांधली गेलेली असते. आई-वडील आपल्या कष्टातून मुलांना वाढवितात. त्यांना शिक्षण देतात. कारण त्यांच्या पडतीच्या काळात या मुलांनी आधार द्यावा पण या गोष्टी बऱ्याच वेळा फसलेल्या दिसतात. *अनोळखी* ही कथा या आशयाची आहे. ताराबाई यांची मुलगी नीना आणि मुलगा मंदार परदेशात स्थिरावलेली आहेत. त्यांच्या वडिलांना दवाखान्यात दाखल केल्यानंतरही ती मायदेशी परत येऊ शकत नाहीत. परदेशी कुटुंबव्यवस्था आणि भारतीय कुटुंबव्यवस्था यामध्ये असणारे अंतर ती भरून काढू शकत नाहीत. येथील कुटुंबातील व्यक्ती मुलांचे लग्न झाले तरी त्यांच्या संसारातील समस्या आपल्याच समजतात. याउलट तेथील

नीना अणि मंदार यांना आपल्या संसारातील समस्यात दुसऱ्या कुणाचीही ढवळाढवळ आवडत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा असणारा तेथील अर्थ खूपच व्यापक व विलक्षण असा ताराबाईंना वाटतो. त्यांची नात अविवाहित असूनही गरोदर आहे. यापुढे जाऊन ती या मुलाला जन्म देऊ इच्छिते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिला त्या मुलाचा 'बाप' नक्की कोण आहे हे देखील सांगता येत नाही. ही नीनाच्या कुटुंबाची अवस्था तशीच मंदारच्या. नीना आणि मंदार दोघे बहीण-भाऊ असूनही त्यांच्यामधील हे नाते क्षीण झाल्याचे दिसते. या कथेतून ताराबाई आणि त्यांच्या मुलांची कुटुंबव्यवस्था येते.

व्यक्तीच्या जडणघडणीत कुटुंबाचा आणि समाजाचा वाटा खूप मोठा असतो. कुटुंब व्यक्ती-व्यक्तीमधींल प्रेमाच्या, विश्वासाच्या पायावर उभे असते. पण जेव्हा या विश्वासास, प्रेमास तडे जातात तेव्हा कुटुंबालाही तडे जातात. मोनिका गजेंद्रगडकर यांची *नाळ* ही कथा अशाच प्रकारचा आशय व्यक्त करते. स्त्री-पुरूष समानता हा जरी महत्त्वाचा मुद्दा असला तरी तो प्रत्येकजण पाळतोच असे नाही. स्त्री-पुरुषामधील नाते समानतेच्या पातळीवर, व्यक्ती स्वातंत्र्याला पोषक असावे हा आजच्या युगाचा आग्रह असला तरी असे घडेलच असे नाही. या कथेतील सुमित्रा आताच्या युगातील असूनही तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याला, इच्छा-आकांक्षाना हा समाज किबंहुना तिचा पतीसुध्दा मान देत नाही. स्त्रीला कुटुंबात दुय्यम स्थान दिले जाते. सुमित्राला शरीरोपभोगाचे साधन असाच तिचा दर्जा कुटुंबात दिसतो. बदलत्या परिस्थितीची दखल घेऊन स्वतःमध्ये आणि कुटुंबामध्ये बदल करण्याची आवश्यकता पुरुषांनी मान्य केली नाही. आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जपणूक करू पाहणाऱ्या विवाहित स्त्री समोर जे पेच पडतात त्याचे चित्रण या कथेमध्ये येते.

नागर जीवनातील मध्यमवर्गीय लोकांच्या कुटुंबातील समस्या, ताण याचे चित्रण अर्थ आणि *भूप* या कथेतून प्रकट झाला आहे. *अर्थ* मधील विणा आणि विद्याधर यांचे जीवन मुलीच्या मृत्यूने वेगळ्या वळणाला लागते. त्यांची मुलगी मीता रेल्वे अपघातात ठार होते. याचे खोल परिणाम होऊन त्यांचे छोटे कुटुंब छिन्न-विछिन्न होते. विद्याधर संसारातून विरक्त

होतो तर विणाला मानसिक आधार देण्यासाठी कोणीच शिल्लक नसते. एका घटनेने विस्कळीत झालेले कुटुंब या कथेतून येते. तसेच *भूप* ही कथा कौटुंबिक त्रिकोणातील असणाऱ्या व्यक्ती-व्यक्तींमधील मतभेद दाखवते. यामधील अवधूतपंत व त्यांचा मुलगा विवेक दोघांच्यामध्ये पारंपरिक नीती मूल्ये व आधुनिकतेने निर्माण केलेली मूल्ये यातील हा संघर्ष आहे.

कुटुंबाच्या अंतर्गत राहून सुख शोधणाऱ्या माणसाला जेव्हा दुःख भोगावे लागते तेव्हा या कुटुंबाचे तुटलेपण जाणवते. आधुनिक काळातील कुटुंबामध्ये झालेले अंतर्बाह्य बदल, माणसांचे वागणे, नातेसंबंध या सर्वांतून दिसते. अशा बदलत्या कुटुंब व्यवस्थांचे चित्रण लेखिकेने आपल्या कथातूंन केले आहे.

२. मध्यमवर्गीय कुटुंब जीवनाचे चित्रणः

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथाचित्रणाचा प्रदेश आहे तो मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचा. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शहरांची झपाट्याने वाढ झाली. या नागर संस्कृतीत मध्यमवर्गीय संस्कृतीची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आतंरिक ताण-तणाव, छोटी कुटुंबे, शहरीकरण, स्थलांतर, उंचावत गेलेले राहणीमान, आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांचा वाढता वाटा अशा विविध विषयांनी युक्त कथा या काळात लिहिल्या जाऊ लागल्या. याच दरम्यान एकत्र कुटुंबव्यवस्थेचे विघटन होऊन निर्माण झालेली विभक्त कुटुंबव्यवस्था, विघटनशील कुटुंब व्यवस्थेतील तुटणाऱ्या, विखुरल्या जाणाऱ्या भावबंधाचा व माणसा-माणसांतील संबंधाचा शोध मराठी नवकथेतून घेतला जाऊ लागला. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून जी कुटुंबव्यवस्था येते ती अशा स्वरूपाची आहे. या मध्यमवर्गीय जीवनाला भिडणाऱ्या अनेक प्रवाहांचे, नागर जीवन जगणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाचे अनुभव त्या आपल्या कथांमधून मांडतात. वरवर सुखी दिसणारा हा मध्यमवर्गीय कुटुंबातील मणूस अनेक विवंचनेत कसा अडकलेला असतो याचे चित्रण लेखिका आपल्या कथामधून करतात.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून येणारे कुटुंब हे मध्यमवर्गीय जीवनजाणिवा घेऊन येणारे आहे. या कुटुंबात कर्त्या पुरुषाचे वर्चस्व दिसते. स्त्रियांना तिथे दुय्यम दर्जा दिला जातो. कुटुंबातील पती-पत्नीमध्ये वैचारिक स्वरूपाचे मतभेद जाणवतात. हे कुटुंब छोट्या-मोठ्या सुख-दुःखांनी आनंदीत होणारे आणि मोडूनही पडणारे अशा स्वरूपाचे आहे. अपवादात्मक कुटुंबात स्त्री जीवनाचा विचार केलेला दिसून येतो. एकूणच त्यांच्या कथेतून येणारी कुटुंबव्यवस्था मध्यमवर्गीयांची जीवनपद्धती घेऊन येते.

अनोळखी कथेतील नीनाला विवाहाच्या बंधनाशिवाय गरोदर असणाऱ्या मुलीचे संबंध जरी योग्य वाटत असले तरी मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या ताराबाईंना तो व्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेला स्वैराचार वाटतो. मध्यमवर्गीय माणूस आणि त्यांची नैतिक मूल्ये ताराबाईंच्या स्वरूपातून या कथेमध्ये येतात. मध्यमवर्गीय कुटुंबातील रुढ परंपरेला काही कथांमधून लेखिका चित्रित करतात. नाळ कथेतील सुमित्रा आपल्या पतीकडून होणारा छळ, घुसमट यातून उपाय म्हणून दिघ्यांकडे निघून जाते. तसेच *अनोळखी* कथेतील अंजूच्या बाबतीतही घडते. पण इथे समाज तिलाच दुषणे देतो. स्त्रीलाच कुलक्षणी, वाईट वळणाची मानली जाते आणि हे मानणारा फक्त समाजच नसतो तर तीची स्वतःची मुलगी, आई-वडील यांचाही समावेश त्यामध्ये होतो. पण हेच तत्त्व *जन्म* कथेतील नाथांच्या बाबतीत लागू पडत नाही. ते त्यांच्यापेक्षा वयाने कितीतरी लहान असणाऱ्या मालविकाशी संबंध ठेवतात. पण या गोष्टी मात्र समाजाला कधीच गैर वाटत नाहीत. म्हणजे समाजातील मध्यमवर्ग आणि त्याचा मध्यमवर्गीय विचार आणि वृत्ती याचे चित्रण लेखिका करतात.

संवेदनशील स्त्री आणि त्यातही कुटुंबाचा आधारस्तंभ असणारी मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्री तर आदर्शच असते. पण बऱ्याच वेळा यामुळे कुटुंबात स्त्रीची कुचंबणा होत असते. *अर्थ* कथेतील विणा आपल्या मुलगीच्या दुःखाने मानसिकदृष्ट्या आधारहीन बनते. पण बुडणाऱ्या घराला वाचविण्यासाठी स्वतः खूप सहन करत राहते. नवऱ्याकडून न मिळणारा आधार ती गणेश या मतिमंद मुलांच्या प्रेमातून मिळविण्याचा प्रयत्न करते पण

तिथेही तिची उपक्षा होते. या कथेतून मध्यमवर्गीय स्त्री आणि तिचा सोशिकपणा लेखिकेने चित्रित केला आहे.

आजही समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबात स्त्रीचा दर्जा दुय्यम असून तिच्या अपेक्षांचा, भावनांचा विचार करण्याची गरज कुटुंबाला वाटत नाही. पण अलिकडच्या युगात स्त्रीला आलेल्या आत्मभानामुळे ती स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ लागली आहे. *बाबाची आई* कथेतील राधाची आई नवऱ्यामुळे होणारी स्वतःची कुचंबणा टाळून घटस्फोट घेते. मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये आई-वडिलांच्या वेगळे होण्यात त्यांच्या मुलांचे होणारे हाल, त्यांची मानसिकता मोनिका गजेंद्रगडकर यांनी या कथेतून मांडली आहे. नवे बदलाचे वारे आणि जुने न बदलणारे पारंपरिक कौटुंबिक वातावरण यांच्यातील ताण *संक्रमण* या कथेतून येतो. तर *नातं* ही त्यांची तशी सरधोपट कथानक असणारी कथा. तारुण्यातच वैधव्य आलेल्या उमाचे आपल्या सासरच्या घरापासूनचे जाणवणारे तुटलेपण दाखविणारी कथा.

मध्यमवर्गीय कुटुंबात जगणाऱ्या माणसांच्या कौटुंबिक पातळीवरील प्रश्न, समस्या या कुटुंबातील स्त्रीची होणारी कुचंबणा, फरपट तसेच त्यांच्या मुलांचे प्रश्न, त्यांच्या आशा-आकांक्षा, निराशा, तुटलेपण या सर्वांना मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथेतून रेखाटतात. तसेच मध्यमवर्गीय माणसाचे जगणे, जगण्याविषयीचे त्यांचे नियम, नैतिक मूल्ये याही सर्व गोष्टी त्या आपल्या कथेतून मांडतात.

३. नाते संबंधांचे चित्रण :

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा मध्यमवर्गीय कुटुंबसंस्कृतीत आकाराला आलेले नातेसंबंध व त्यांचे भावविश्व चित्रित करतात. तसेच त्यांच्या कथा व्यक्ती-व्यक्तीमधील नातेसंबंधामुळे दुरावलेल्या तर कधी त्यामुळे सांधल्या गेलेल्या नात्यांचे चित्रण करतात. मानवी संबंधांतून निर्माण होणारे प्रश्न व ते सोडविण्याची अनोखी वृत्ती यांचे दर्शन त्यांच्या कथेमधून होते. मानवी मनाची अनाकलनीय, गूढ, गुंतागुंत मानवी नातेसंबंधांना बऱ्याच वेळा

अयशस्वी ठरवत असते. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या *देणं, नाळ, जन्म* य कथामधून मानवी नात्याच्या समजाची प्रचिती येते. बऱ्याच कथालेखकांनी स्त्री-पुरुष संबंधावर अनेक कथा लिहिल्या आहेत. मोनिका गजेंद्रगडकरही या विषयातील वेगवेगळ्या आशयांनी, संदर्भाची व अर्थाची वेगळी वलये निर्माण करणाऱ्या कथा लिहितात. कथेच्या निर्मितीसंबंधी त्या म्हणतात- *स्त्री आणि पुरूष या दोन भिन्न प्रवृत्तीतील सनातन बंधनांबद्दल, त्यांच्या आदिम लैंगिक भावनांबद्दल असे अनेकदा प्रश्न उलगडणारी कोडी बनून ग्रासत राहतात. कधी या प्रश्नांतून पुन्हा नवे प्रश्न अगदी उत्तरातूनही उद्‌भवतात.* (मोनिका गजेंद्रगडकर, जुऑस,२००८,३५)

लेखिकेने आपल्या कथातून मध्यमवर्गीय माणूस चितारला आहे. त्याबरोबरच त्यांच्या जीवनआकांक्षा, सुख-दुःखाच्या, यश-अपयशाच्या विविध छटा कथातून निर्माण झाल्या आहेत. डॉ.तारा भवाळकर म्हणतात, *सर्वसाधारणपणे सुस्थित मध्यमवर्गीय कुटुंबकक्षेतील नातेसंबंध आणि वातावरण या कथांत आहे. तरीही ही कुटुंबे सुस्थिर मात्र नाहीत. तर वर सगळे आलबेल दिसत असले तरी नातेसंबंधातील विस्कटलेपणामुळे या कुटुंबातील माणसे अस्वस्थ, अस्थिर आहेत.* (तारा भवाळकर, ३०जाने २००५,११) नातेसंबंधातून आलेले हताशपण, एकटेपण, उदासपणाचे चित्रण त्यांच्या कथेतून येते.

लेखिका आपल्या कथातून स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंधाबरोबर, आई-वडील-मुले, बहीण-भाऊ यांच्यामध्ये असणाऱ्या नातेसंबंधांचे चित्रण करतात. विविध प्रकारची नाती, त्या नात्यांचे वेगवेगळे स्वर, त्यातून आविष्कृत होणाऱ्या अनेकविध भावच्छटा त्यांच्या कथातून येतात. पती-पत्नी यांच्यातील नातेसंबंधाचे चित्रण करणारी *नाळ* ही त्यांची कथा आहे. स्त्रीकडे फक्त शारीरिक गरज म्हणून पाहण्याचा अण्णांचा दृष्टिकोण, त्यातून सुमित्राची होणारी शारीरिक आणि मानसिक पिळवणूक चित्रित होते. शरीराच्या पलिकडे आपल्या आकांक्षा बाळगणारी सुमित्रा घर सोडून दिघ्यांकडे निघून जाते. पण तिथेही तिला उपेक्षाच मिळते आणि स्वतःच्या मुलींपासूनही ती दूर जाते. विसंगत पती-पत्नीच्या जोडीमुळे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कुटुंबात निर्माण झालेले ताण, या ताणामुळे तिच्या आणि तिच्या मुलीमध्ये निर्माण झालेली अदृश्य भिंत याचे चित्रण ही कथा करते.

भूप ही त्यांची वरवर सुस्थितीत दिसणारी कथा असली तरी नातेसंबंधातील आंतरिक पीळ यामुळे होत गेलेला गुंता या कथेतून स्पष्ट होतो. आपल्या संगीत घराण्याचा वारसा आपल्या मुलाने जपावा ही अपेक्षा बाळगणारे अवधूतपंत, तर परंपरागत शिक्षणाऐवजी आधुनिक शिक्षणामध्ये रस घेणारा विवेक यांच्यामध्ये असणाऱ्या मतभेदामुळे नात्यातील निर्माण झालेला ताण चित्रित होतो. कलावंताचे असणारे व्यामिश्रपूर्ण जीवन आणि त्यातून त्यांना स्वतःला होणाऱ्या त्रासाबरोबर नात्यातील आई-मुलाची होणारी ओढाताण स्पष्ट होते. *संगीत* या कलाक्षेत्राशी संबंधीत अनुभव त्यांच्या *भूप* कथेबरोबर *जन्म* या कथेतूनही येतो. त्यांच्या *जन्म* या कथेतून अशाच प्रतिभावंत कलावंत त्यांच्या नात्यांतील संबंध, संघर्ष, आई-वडील-मुलांचे असणारे नाते येते. बाई आणि नाथ वेगवेगळ्या घडणीचे कलावंत. त्यामुळे ते एकमेकांपासून वेगळे झालेले. पण सत्यजितला दोघांचेही संगीत आवडते. नाथांचे मालविकाशी असणारे संबंध, हे न कळून सत्यजित देखील मालविकाकडे आकर्षिला जातो. या सर्वांमुळे नात्यांमध्ये न सुटणारा गुंता निर्माण होतो. चाकोरीतील नातेसंबंधांना चितारण्यापेक्षा लेखिका चौकटीबाहेरचे जग, त्यातील माणसे आणि त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध याचे चित्रण त्या आपल्या कथेतून करतात. अशाप्रकारचे संबंध त्यांच्या *देणं* या कथेतून निर्मलाच्याद्वारे आणि *अनोळखी* या कथेतून अंजूच्या द्वारे, *आधार* कथेतील अरुणच्या द्वारे व्यक्त होतात.

नात्यातील दुरावा वाढायला अंतर्गत आणि बाह्य परिस्थिती कारणीभूत असते. आई-वडील मुलांमध्ये भेदभाव करतात तेव्हा एकाला त्यांच्या प्रेमापासून वंचित रहावे लागते तर एकाला या प्रेमातून दडपण येते. अशाच दोन भावांच्यामधील आणि आई-वडिलांच्या नात्यांतील ताण *रुट्स* या कथेतून येतो. प्रेमापासून वंचित राहिलेला केदार, श्रीला त्याच्या

आजारपणात जीवनरस पुरविणारा, भावाविषयीचे प्रेम आणि त्याच्यामुळेच आपल्या वाटयाला आलेले पोरके जीवन यांच्यात समतोल साधत जातो.

बऱ्याचवेळा नातेसंबंधांचे चित्रण, विशेषतः स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधाचे चित्रण करत असताना मराठी लेखकांना उथळ, भपकेबाज, लेखनाचा मोह आवरत नाही. पण या गोष्टी उत्कृष्ट कथेच्या बाबतीत मारक ठरतात. परंतु मोनिका गजेंद्रगडकर यांची या विषयावरची कथा हा मोह टाळून चित्रित विषयाचा गंभीरपणाचा सूर कायम ठेवते. 'स्त्री-पुरुष यांचे नातेसंबंध' हा विषय त्या अतिशय संयमाने आणि तितक्याच चिकित्सक वृत्तीने हाताळतात. नातेसंबंधातील अनुभवविश्वासंबंधी त्या म्हणतात, *मानवी नात्यांमधलं उसवत जाणं माणसाच्या मृत्यूशीही कसं जोडलेलं असतं, हा धागा मला त्यात सापडला. एकूणच माणसा-माणसांत एकमेकांना समजून घेताना येणाऱ्या अडचणी, आड येणारे त्यांचे अहंम आणि त्यातून दुरावत जाणारी नाती, न सांधले जाणारे माणसांमधले पूल, त्यातल्या वेदना मला अस्वस्थ करतात. या नात्यांचे वेगवेगळे पैस मला खुणावत राहतात. या नात्यांचा अखंड शोध घेण्याचं एक वेडच मला लागत गेलं आणि त्यातून वेगवेगळ्या अनुभवांचे पदर खुणावतही गेले.* (मोनिका गजेंद्रगडकरः मुलाखत : डिसेंबरः२०१०) स्त्री-पुरुष संबंधाचा सनातन झगडा, चाकोरीबाहेरचे नातेसंबंध, तसेच नातेसंबंधात निर्माण होणारे ताण-तणाव, तुटलेपण, घुसमटलेपण, समलिंगी संबंध या सर्वांचे चित्रण त्या आपल्या कथेतून करतात.

३.१ नातेसंबंधात स्त्रीची होणारी कुचंबणा :

आजच्या वैज्ञानिक युगात अजूनही बऱ्याच कुटुंबामध्ये पुरुषसत्ताक पद्धती आहे. यामध्ये स्त्रियांचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. पारंपरिक आणि पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत आपल्या आर्थिक सत्तेच्या बळावर पुरुष कुटुंबाचे आर्थिक, भौतिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनमान नियंत्रित करत असतो. हिंदू धर्मातील तसेच इतर धर्मातीलही मध्यमवर्गीय स्त्रीचे कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा हा पुरुषकेंद्रित असतो. यातून येणारी स्त्री

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

व्यक्तिरेखा ही स्त्रीवादाचा पुरस्कार करणारी येत नाही तर ती एक सामान्य स्त्रिची व्यथा मांडणारी अशी येते. तिची जीवनव्यवस्था, जीवनव्यवहार पुरुषाने निर्माण आणि नियंत्रित केलेले असल्याने स्वाभाविकपणे स्त्रीचे अनेक परींनी आणि अनेक पातळ्यावर शोषण होत असते. अशा शोषणांची चित्रणे मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथामधून अतिशय संवेदनशीलतेने आणि नेमकेपणाने चितारतात. यासंदर्भात सुभाष नाईक म्हणतात, *या संग्रहातील बहुतेक कथांमध्ये स्त्रियांचे भावविश्व, त्यांच्यासमोरील प्रश्न, त्यांच्या व्यथा यांचं चित्रण असलं तरी त्यात कोठेही स्त्रीवादी अभिनिवेश आढळून येत नाही. हे विशेष देणं, नाळ, अर्थ या कथांमधून स्त्रियांच्या एरवी कोंडून राहिलेल्या स्फुट-अस्फुट भावनांचं दर्शन घडतं.* (सुभाष नाईक : मार्च २००५:२) त्यांच्या *देणं, नाळ, श्रध्दा, संक्रमण, नातं, जन्म* या कथेतील स्त्रिया या पुरुषसत्ताक व्यवस्थेत कुचंबलेल्या गेलेल्या, कोंडलेल्या, असहाय्य, आगतिक अशा स्वरूपात भेटतात.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून येणारी स्त्रीची कुंचबणा शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही पातळ्यावरील असते. स्वतःच्या विचारावर ठाम असणारी निर्मला प्रेमातील भावनांना फशी पडते. पण यामध्ये तिची कुचंबणा होते. नात्यांचे बंध मान्य नसणारी व स्वतःच्या विचारांवर खंबीर असणारी निर्मला या कथेतून येते. पण नव्याने जन्माला येऊ पाहणाऱ्या मुलाच्या प्रश्नाने तिची कोंडी होते. गजानन आणि निर्मलाचे संबध, कोणत्याही बंधनाशिवाय एकत्र राहणारे दोघे, पण जन्माला येऊ पाहणाऱ्या नव्या अंकुराला गजानन जेव्हा नाकारतो तेव्हा ती कोंडीत सापडते. स्वतःच्या विचारांवर ती जरी ठाम असली तरी आपल्या मुलाच्या भविष्यकाळातील प्रश्नांनी ती व्याकुळ होते. लग्नासारखे रूढीबद्ध संकेत समाजाने घातल्यामुळे निर्मला स्वतःच्या मुलाच्या भविष्याबद्दल भयभीत होते. पुरुषाच्या पाठिंब्याशिवाय तिला काही न करता आल्यामुळे विशिष्ट कोंडीत ती सापडते.

आधुनिक विचारांची पाळेमुळे परंपरेच्या चक्रात सापडलेली असल्यामुळे, स्त्रीला केवळ उपभोगाचे साधन समजून तिच्या भावनांचा चोळामोळा केला जातो. अशा शारीरिक

आणि मानसिक शोषणाला बळी पडलेली सुमित्रा *नाळ* कथेत दिसते. पती-पत्नीतील शारीरिक संबंधातून निर्माण झालेले ताण, स्त्रीचे होणारे शोषण, त्याला उघडपणे प्रतिकार न करता ती दुसऱ्या मार्गाचा स्वीकार करते. पण अशावेळी तीच दोषी ठरते. सुमित्रा समाजाच्याच नव्हे तर स्वतःच्या मुलीच्याही दृष्टीने व्यभिचारी मानली जाते. पण स्वतःच्या नवऱ्याकडून शारीरिक अत्याचाराला बळी पडणारी सुमित्रा शारीरिक आणि मानसिक अशा दोन्हीमध्ये तिची कुचंबणा होत असते. तर याच कथेतील नेत्राची आत्या मंगल ही वेडी झालेली असते. कारण मंगलचा नवरा तिला 'फक्त मासाचा गोळा' असं म्हणून तिच्या स्त्रीत्वाला नाकारत असतो. यातून तिचे झालेले मानसिक शारीरिक शोषण मोनिका गजेंद्रगडकर *नाळ* कथेतून मांडतात.

स्त्रियांवर अन्याय, अत्याचार, शोषण करण्यास फक्त तिचा नवराच जबाबदार असतो असे नाही, तर समाजातील इतर घटकही याला जबाबदार असतात. धार्मिकतेच्या नावाखाली बऱ्याच वेळा पारंपरिक मूल्य व्यवस्थेच्या चौकटीत स्त्रीला कोंडली जाते. *श्रध्दा* कथेतील यशोदाचे शोषण तिच्या मुलाकडून केले जाते. धर्माबद्दलची असणारी कट्टरता माणसाच्या विचारांना बऱ्याचवेळा विकृत बनवत असते. या धार्मिक वृत्तीतून अवास्तव बंधने यशोदाचा मुलगा अर्शद आपल्या आईवर लादत असतो. तो कुटुंबातील असणारे तिचे स्थान नाकारुन बुरखा घालणे, नमाज पढणे अशी बंधने तिच्यावर घालतो. हिंदू धर्माबद्दल असणारा आकस तो असलमची वाग्दत्त हिंदू असणाऱ्या वनितावर अत्याचर करुन व्यक्त करतो. वनिता आणि यशोदा या दोघी धार्मिकतेच्या नावाखाली शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या शोषणाला बळी पडतात.

जसे स्त्री-शोषणाला नात्यातील कोणताही पुरुष जबाबदार असतो तसेच बऱ्याचवेळा स्त्रीच्या शोषणाला स्त्रीचं कारणीभूत ठरत असते. पारंपरिक आणि बुरसटलेल्या विचारांनी युक्त स्त्री दुसऱ्या स्त्रीचे स्वातंत्र्य तिच्या इच्छा यांना अटकाव करत असते. *संक्रमण* या कथेतील रेणूची तिच्या आईकडूनच कुचंबणा होत असते. *नातं* ही कथा अशाच स्त्री

कुचंबणेला चितारणारी आहे. पारंपरिक मूल्यव्यवस्थेच्या चौकटीत कोंडलेली स्त्री बऱ्याच अर्थानी पांगळी होऊन जाते. या कथेतील उमा अशाच कोंडीत सापडते. उमा गरोदर असताना अचानक तिच्या नवऱ्याचा अपघातात मृत्यू होतो. या गोष्टीची वाच्यता कशी करावी? किंवा या गोष्टीबद्दल निर्णय कसा घ्यावा? या प्रश्नानी ती व्याकूळ होते. वर्षानुवर्षे दडपून गेलेले स्त्रीचे विचार अचानक उभारी खाऊ शकत नाहीत. पतीच्या मृत्यूनंतर तर तीला कुटुंबात कमी लेखले जाईल या विचारानेच स्त्रीची मानसिकता कोंडली जाते याचे चित्रण ही कथा करते. तसेच *जन्म* मधील मालविका पोटात रुजलेल्या अंकुराला जन्म देऊ इच्छित असली तरी ती अजूनही अविवाहीत आहे व समाजाच्या दृष्टीने हे वागणे अनैतिक समजले जाते. यामुळे तिची दयनीय अवस्था होते.

मोनिका गजेंद्रगडकर या आपल्या विविध अनुभव विश्वातून स्त्रियांच्या शोषणांना, त्यांच्या प्रश्नांना कथेच्या माध्यमातून साकारतात. *निरनिराळ्या कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या वेगवेगळ्या वयोगटातील आणि भिन्न-भिन्न कार्यक्षेत्रीतील स्त्रियांची होणारी मानसिक कुचंबणा कमी अधिक प्रमाणात सारखीच असल्याचे येथे प्रकर्षाने जाणवते.* (कमलाकर राऊत : ५जुलै२००८:१०)

३.२ बदलत्या नातेसंबंधांचे चित्रण :

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथा गतकाळापेक्षा वर्तमान आणि या वर्तमानातील बरे-वाईट होणारे बदल, बदलणारी माणसे, त्यांचे जीवन, नात्यांमध्ये होणारे बदल यांना टिपतात. सुख-दुःखाला कारणीभूत असणाऱ्या भावना आणि नातेसंबंधाच्या बदलाचे चित्रण त्या आपल्या कथेतून करतात. रक्ताच्या नात्यांमध्ये जाणवणारा फोलपणा, कोणतीही अपेक्षा न करता जोडले गेलेले निरुद्देश नातेसंबंध, धार्मिक, आर्थिक परिस्थितीच्या पेचातून नात्यांमध्ये आलेले तुटलेपण या सर्वांचे चित्रण लेखिका करतात. समाजातील रुढ अशा पात्रांचे वर्तन टाळून त्या स्वतंत्र्यपणाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतात. हा

एकाअर्थी त्यांचा स्वतःचा आत्मशोध आहे. संस्कृतींनी, रुढींनी जो संकेतव्यूह तयार केला आहे तो उधळून लावून प्रत्यक्ष जीवनातील व्यक्तींच्या कृतींचा, त्यांच्यातील क्लिष्ट, जटील गुंत्याचा शोध त्या घेतात. माणसांमाणसांतील नातेसंबंध हे संवेदनशील असतात आणि ते अपेक्षित व अनपेक्षित स्वरूपात बदलत असतात. मराठी साहित्याच्या प्रत्येक कालखंडात आणि प्रत्येक प्रवाहात नातेसंबंधांचे हे बदलते रूप त्या-त्या वेळी चित्रित होत आले आहे. परंपरा, रुढी बदलल्या की त्यानुसार स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोणही बदलत जातो. तर काही वेळा असे बदल न स्वीकारता हा दृष्टिकोण तसाच राहतो, तर कधी तडजोड म्हणून तर कधी पुरुषी वर्चस्वातून तर कधी व्यक्तिस्वातंत्र्यातून या नातेसंबंधांना वेगवेगळी रूपे प्राप्त होत गेलेली दिसतात. महत्त्वाचे बदल जाणवतात ते पती-पत्नी यांच्या नात्यांमध्ये.

कधी कधी एकमेकांना समजावून घेऊ न शकणाऱ्या जोडप्यांमधील नातेसंबंधात ताण पडतात. तर कधी पत्नीला हीन लेखून स्वतःचे वर्चस्व गाजविण्याच्या मानसिकतेतून बदलत जाणारी नाती ही शक्यतो या नात्यांमध्ये दुरावाच निर्माण करतात. *बाबाची आई* कथेतील राधाची आई आपल्या नवऱ्याच्या कमीबुद्धीच्या जीवनशैलीशी मिळते जुळते घेऊन थकते तेव्हा ती या नातेसंबंधांना पूर्णविराम देते. तर *जन्म* मधील नाथ आणि बाईंच्या विचारात असणारी तफावत पराकोटीला जाऊन नाथ वेगळे होतात व आपल्या मुलाच्या वयाच्या मालविकाबरोबर राहू लागतात. तर *नाळ* मधील नेत्राच्या वडिलांकडून सुमित्राची उपेक्षा होते त्यामुळे ती दिघ्यांशी मैत्री जोडून घरातून निघून जाते. आजच्या विवाहीतेची जीवनशैली पूर्वीच्या विवाहीतेपेक्षा वेगळी आहे. तिची जीवनदृष्टी वेगळी आहे. आज पती-पत्नी दोघांमधील नाते बदलले आहे. पूर्वीसारखे पत्नी पतीची भक्त नसून सहधर्मचारिणी आहे. ती पतीच्या बरोबरीने शिकते, कमविते. स्वतःच्या भावनांची, विचारांची ती स्वतः कदर करु लागली असल्याने नाते संबंधात हे बदल घडतच राहणार. अशा बदलांचे चित्रण लेखिका आपल्या कथांतून करतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विवाहित स्त्रीच्या जीवनात पतीला महत्त्वाचे स्थान असते तसेच सासू-सासऱ्यांनाही असते. सासू म्हणजे सुनेला छळणारी अशी मनोधारणा सामान्यपणे सर्वांची असते. पती-पत्नीच्या नात्यांमध्ये जसे बदल झाले आहेत तसेच सासू-सुनेच्या नात्यांमध्येदेखील बदल झालेले दिसतात. आज स्त्री विरुद्ध पुरुष असे सूत्र नाही तसेच सासू विरुद्ध सून असेही नाही. आपला मूलगा आणि सून यांची जीवनशैली कशी असावी याविषयीचे सर्व हक्क सासू आता आजमावत नाही तर त्यांचे निर्णय त्यांना घेऊ दिले जातात. सासू सुनेचा तिच्या भावनांचा विचार करु लागली आहे. *नातं* कथेतील उमा आणि तिच्या सासू-सासरे यांच्या नात्यामध्ये हा मोकळेपणा जाणवतो. पण काही वेळा मात्र व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ फार वेगळा लावला जातो. परदेशी संस्कृतीत वाढलेली सून. तिला समजावून घेऊन आपल्या मुलांप्रमाणे मानणारी ताराबाई आपल्याला *अनोळखी* कथेतून दिसते. तिच्या संस्कृतीवर कोणतीही बंधने न लादता तिच्या विचारांबरोबर वावरणारी ताराबाई. जेव्हा सून आपल्या मूलाला सोडून गेल्याचे समजते तेव्हा ती हळहळते, दुःखी होते. मुलाचा संसार परत सुरळीत लावण्यासाठी ती धडपडत राहते.

नातेसंबंधातील हे बदल काही सुस्वरूपाचे तर काही वाईट स्वरूपाचे ठरतात. पती-पत्नी, सासू-सुनेचे नाते बदलत गेलेले दिसते तसेच आई-वडील आणि मुले यांच्या नात्यांमध्येही हे बदल जाणवतात. या नातेसंबंधातील भोवतालच्या बऱ्या-वाईट जडण घडणीचा प्रभाव पडलेला दिसतो. *भूप* मधील विवेक व अवधूतपंत यांच्यातील नाते, *जन्म* मधील सत्यजित आणि नाथ यांच्यातील नाते, *संक्रमण* मधील रेणू आणि तिच्या आईमधील नाते, तर *नाळ* मधील नेत्रा आणि सुमित्रा या मायलेकाचे नाते *श्रद्धा* मधील यशोदा आणि अर्शद यांचे नाते. या सर्वांच्या नातेसंबंधातील ताण, वैचारिक मतभेदातून, तर कधी आई-वडिलांच्या अनैतिक वागण्यातून, तर कधी धार्मिक, आर्थिक बाबीतून हे निर्माण झालेले दिसतात. पूर्वी स्त्रीने परपुरुषाचा विचार करणे पाप मानले जायचे. पण स्वतःच्या पतीकडून होणारे शरीरावरचे अन्याय दूर सारुन परपुरुषाच्या प्रेमळ सहवासाचा स्वीकार

करणारी *नाळ* मधील सुमित्रा दिसते. लग्न या बंधनाशिवाय आपल्या आवडत्या व्यक्तीबरोबर शारीरिक सुख मिळविणारी अंजू, मालविका, निर्मला दिसते. आणि या सर्व तरुणी यापुढंच पाऊल म्हणून पोटात वाढणाऱ्या जीवाला जन्मही देऊ इच्छीतात. समाजातील या विलक्षण नात्यांना आणि त्यामध्ये घडत जाणाऱ्या बदलाचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथातून सामर्थ्यानिशी करतात.

४.ढासळत्या कुटुंब व्यवस्थेचे चित्रणः

या नातेसंबंधातील एक भाग म्हणजे त्यांच्या कथेतून व्यक्त होणारे ढासळत्या कुटुंबव्यवस्थेचे भान. १९८० नंतरच्या दशकामध्ये कथालेखन करणाऱ्या मोनिका गजेंद्रगडकर यांनी देखील समाजातील स्थित्यंतराचे चित्रण केले. या वेगवेगळ्या स्थित्यंतराचे परिणाम चांगले आणि वाईट अशा दोन्ही स्वरूपामध्ये झाले. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, नातेसंबध यावर झालेले परिणाम मात्र म्हणावे तितके चांगले नाहीत. या स्थित्यंतराचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे कुटुंबामध्ये अनास्था, दुरावा, परकेपणा, असुरक्षितता निर्माण झालेली असल्यामुळे माणसा-माणसांमध्ये दुरावा निर्माण झाला. या सर्वाची फलश्रुती म्हणजे शहरी कुटुंबव्यवस्था अस्थिर बनण्यात झाली.

माणसांनी आणि कुटुंबानी मिळून जसा समाज बनतो तसेच अनेक मनांची आणि नात्यांची जडणघडण होत कुटुंबव्यवस्था चालत असते. मुले-आईवडील व इतर नातलग यांच्यामध्ये परस्परांविषयी असणारा जिव्हाळा या नात्यांना घट्ट बांधून असतो. पण बऱ्याचवेळा माणसाचे जगणे विशिष्ट कारणास्तव विसंगत होत जाते. व्यक्तिगत कारणे, सामाजिक, धार्मिक, इ. अनेक कारणांमुळे कुटुंबाची घडी विस्कटली जाते. आतंरिक कारणाबरोबर बाह्य कारणेही याला जबाबदार असतात. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथांमधून मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्था आणि वेगवेगळ्या कारणास्तव ढासळणारी कुटुंबे याचे चित्रण करतात.

उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त होत गेल्याने तरुण परदेशात विशेषतः अमेरिका सारख्या प्रगतशील देशात जाऊ लागले. पण त्यांच्याशी निगडीत असणारे त्यांचे आई-वडील, लग्नानंतर सासू-सासरे असे नातलग बांधले जाऊ लागले. इथल्या संस्कारात आणि कुटुंबात वाढलेला युवक तिथल्या संस्कृतीशी मिळते-जुळते घेत तिथलाच बनत गेला पण त्यामुळे त्यांची कुटुंब व्यवस्थाही बदलत गेली. सहवास-लग्न-घटस्फोट-मुलांचे प्रश्न यासारख्या गोष्टी नाममात्र होऊ लागल्या. त्यांच्या जगण्यातल्या या बदलाचे परिणाम साहजिकच मूळ देशाशी नाळ जोडून असणाऱ्या कुटुंबावर होऊ लागले. या आशयाशी समरूप मोनिका गजेंद्रगडकर यांची *अनोळखी* ही कथा येते. त्यांची ही कथा म्हणजे ढासळत्या कुटुंब व्यवस्थेचे चित्रण करणारी महत्त्वाची कथा आहे. कथेमध्ये ताराबाई आणि त्यांची मुले, असे एक कुटुंब, त्यांच्या मुलीचे-नीनाचे व मुलाचे-मंदारचे अशी तीन कुटुंबे येतात. कोणत्या ना कोणत्या अडचणीत सापडलेली ही तिन्ही कुटुंबे आहेत. कथेतून त्या कुटुंबाचे विस्कटलेपण, कुटुंबातील सदस्यामध्ये निर्माण झालेले ताण-तणाव याचे चित्रण येते.

कुटुंबामध्ये पती-पत्नी हे दोन महत्त्वाचे सदस्य मानले जातात. दोघांचाही कुटुंबातील दर्जा समानच असतो. पण ज्यावेळी या गोष्टींचा स्वीकार कुटुंबात केला जात नाही तेव्हा मात्र त्या दोघांपैकी कोणावरही अन्याय हा होतच असतो. लेखिकेच्या *बाबाची आई* आणि *नाळ* या दोन अशाच स्वरूपाच्या कथा आहेत. *नाळ* मधील सुमित्रावर तिचा पती शारीरिक उपभोगातून अत्याचार करत जातो. तर *बाबाची आई* मधील राधाची आई आपल्या पतीला कमी बुद्धिमता असल्यामुळे सोडून देते. बऱ्याचवेळा विसंगत जोडी, वैचारिक मतभेद यामुळे नात्यांमध्ये ताण निर्माण होतात. अशा जोडप्यांच्या मुलांवर आणि असेल तर त्यांच्या आई-वडिलांवर खोलवर परिणाम होतो. विसंगत जोडप्यांमुळे मानसिक, शारीरिक कुतरओढ होणाऱ्या राधाची, नेत्राची, सुमित्राची कथा सांगितली आहे. ढासळत्या कुटुंबव्यवस्थेतून निर्माण होणारा गंभीर प्रश्न म्हणजे मुले आणि त्यांची मानसिकता होय. लेखिका अशाच मानसिकतेचे चित्रण नेत्राच्या आणि राधाच्या माध्यमातून करतात.

आई-वडील आणि मुले यांच्यातील प्रेमापोटी आलेले दडपण व एखाद्या मुलाविषयी असणारा तिरस्कार आणि त्यांचे होणारे परिणाम चितारणे, तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या परस्परविरोधी परिस्थितीचे चित्रण करणे हे मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेमधील एक विशेष आहे. त्यांच्या *भूप, रुट्स, जन्म* या कथेतून त्याचे अस्तित्व जाणवते. कुटुंबाच्या जगण्याला आणखी काही वेगळ्या बाजू, वेगळ्या मानवी गरजा असतील याची जाणीव नसणारी माणसे कुटुंबाला कसे उद्ध्वस्त करतात याचे चित्रण येते. नव्या जीवनपद्धतीवर पोसलेला तरुण वर्ग काही वेगळे करण्याच्या शोधात नेहमी असतो. नव्या पिढीच्या या गोष्टी न जाणता परंपरेच्या गर्तेत अडकलेल्या लोकांचे विचार आतंरिक संघर्षाला कारणीभूत ठरतात. *भूप* मधील अवधूतपंत आणि विवेक यांच्यामध्ये असणारे वैचारिक मतभेद आणि त्यातून नात्यामध्ये निर्माण झालेला ताण हा दाहक आहे. आणि या दाहकतेमुळे कुटुंबाला कसे चटके बसतात याचे चित्रण कथेतून येते.

आई-वडील मुलांमध्ये जे भेदभाव करतात त्यातून निर्माण झालेली मुलांची मानसिकता आणि न्यूनगंड कुटुंबाला खिळखिळीत करत असते. याचे चित्रण *रुट्स* मध्ये येते. तसेच *संक्रमण* मध्ये देखील येते. केदार आणि श्री मध्ये तसेच रेणू आणि तिच्या भावांमध्ये केला जाणारा भेदभाव. यातून कुटुंबात ताण, संघर्ष निर्माण होत जातात. *जन्म* ही अनोख्या प्रकारची कथा. आई-वडिलांना एकत्र बांधून ठेवणारा दुवा सत्यजित जेव्हा वडिलांचे आणि मालविकाचे असणाऱ्या संबंधांशी परिचित होतो तेव्हा तोही मुळापासून हादरतो. छिन्नविछिन्न अवस्थेत तो आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच अयशस्वी ठरलेले कुटुंब अनेक आपत्तींना कशाप्रकारे जन्म देते हे या कथेतून समजते.

आई-वडील-मुले यामध्ये असणारे ताण-तणाव, मतभेद, अनैतिक संबंध, नातेसंबंधावरचा उडालेला विश्वास या सर्वांमुळे सध्याची कुटुंबसंस्था कशी कमकुवत, अशक्त होत चालली आहे याचे चित्रण मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून येते. अनेक वर्षापासून चालत आलेली एकत्र कुटुंबपद्धती विभक्त झाली. आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वाढणारी जीवघेणी स्पर्धा, या स्पर्धेच्या पुढे हतबल ठरलेला माणूस, नातेसंबंधामध्ये होत गेलेले बदल ही सर्व स्थित्यंतरे ढासळत्या कुटुंबव्यवस्थेला जबाबदार ठरत गेली. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथांतून मध्यमवर्गीय कुटूंब, कुटुंबातील व्यक्ती आणि या मोडीत चाललेल्या कुटुंबव्यवस्थेला जबाबदार असणाऱ्या इतर गोष्टी या सर्वांचे सूक्ष्म चित्रण करतात.

४.१ परदेशस्थ वातावरण : व्यक्तिकेंद्री मूल्ये व परंपरानिष्ठा यातील ताणः

मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या कथातून शहरी मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्था उभी केली आहे. या कुटुंबातील समस्या, ताण-तणाव, यश-अपयश या सर्वांना लेखिका आपल्या कथेतून मांडतात. परदेशात शिक्षणासाठी गेलेला तरुण वर्ग, त्यांची व्यक्तिकेंद्री मूल्ये आणि मूळ देशातील व्यक्तींची परंपरानिष्ठा या सर्व गोष्टी ढासळत्या कुटुंबाला जबाबदार ठरतात. मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुण तिथल्या संस्कृतीमुळे एक तर पाठीमागच्या लोकांना विसरतात किंवा तिथल्या वातावरणाने दडपून मानसिकदृष्ट्या एकटे पडतात. पाश्चात्त्य संस्कृतीचे हे जीवन जे पचवू शकतात ते तेथीलच होऊन जातात. तर न पचणारे कुटुंबाच्या शोधात मागे येऊ पाहतात. या शक्यता ढासळत्या कुटुंबव्यवस्थेला बऱ्याच अंशी जबाबदार असतात. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या *अनोळखी, भूप, रुट्स* या कथातून या स्वरूपाच्या प्रश्नावर प्रकाश पडतो.

महानगरीय संस्कृतीत उच्च शिक्षितांमध्ये स्त्री-पुरुषांच्या सहजीवनाकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोण जाऊन काहीसा उदार दृष्टिकोण रुजू लागला असला तरी मध्यमवर्गीय माणूस या संबंधांना कितपत मान्य करतात याचे चित्रण लेखिकेच्या *अनोळखी* मध्ये दिसून येते. बदलत्या वास्तवाशी संघर्ष करत कुटुंबाला आपलेपण टिकविण्यासाठी त्यामध्ये बदल करणे काळाची गरज असते. पण असे बदल जेव्हा होत नाहीत तेव्हा विशेषतः तरुण वर्ग त्यामध्ये घुसमटत राहतो. त्यांना वैचारिक मतभेदातून मानसिक अस्वस्थतेला सामोरे जावे

लागते. *भूप* मधील विवेक उच्च शिक्षणासाठी व आपले नशिब आजमाविण्यासाठी वडिलांच्या मनाविरुद्ध परदेशात जातो. पण अगोदरच निर्माण झालेल्या तणावामध्ये अधिकच भर पडत जाते.

एखादी व्यक्ती सुखाचा शोध घेत परदेशात गेली तरीही तिला तेथील आनंद पूर्णपणे लुटता येत नाही. तथील वातावरण भारतीय कित्येक वर्षे स्वीकारतात पण तेथील व्यक्तिवाद, टोकाचे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांच्या मनाला कित्येकदा त्रासदायक ठरू शकते. याचे परिणाम म्हणजे माणूस एकटा पडून नैराश्याच्या भावनेने वेढला जातो. ममतेच्या ओढीमुळे त्या व्यक्तीला मानसिक अस्वस्थता कशी जाणवते हे *रुट्स* या कथेतून लेखिका मांडते. एका वेळी तारुण्याच्या जोशात परदेशी गेलेला श्री भारतातील त्याची मूळं जवळजवळ तोडून टाकतो. पण नोकरीतील जीवघेणी स्पर्धा, सहवास-लग्न-घटस्फोट, मुलांचे प्रश्न यातून तणावाची परिस्थिती निर्माण होते. एकाकी पडलेल्या श्री ला त्याच्या भूतकाळाकडे, मूळाकडे, बालपणाकडे, त्याच्या रुट्सकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. यावेळी आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित असलेला श्री चा भाऊ केदार त्याला आधार देतो. या कथेच्या निर्मितीसंदर्भात लेखिका सांगतात- परदेशी राहणाऱ्या एकाला त्याच्या अस्वस्थतेवर उपाय म्हणून सांगण्यात आलं-*तू रुट्सकडे जा' येथे 'रुट्स' हा शब्द मी ऐकला आणि त्याभोवती अनेक गोष्टी जमा होत गेल्या. त्याचीच एक कथा बनली. कदाचित 'तू तुझ्या मुळांकडे परत जा' हे वाक्य ऐकलं असतं, तर कदाचित ही कथा जाणवलीही नसती.* (मोनिका गजेंद्रगडकर:२००८:२२).

५. दोन पिढ्यातील अंतराचे चित्रण :

मोनिका गजेंद्रगडकर यांनी मानवी नातेसंबंध कुशलतेने आपल्या कथेमध्ये हाताळले आहेत. त्या नातेसंबंधातील पीळ, त्यातील आव्हाने, तसे ताण-तणाव त्या समर्थपणे रेखाटतात. बऱ्याच वेळा नात्यातील ताण, एकमेकांचे वर्तन- विचार यामुळे निर्माण

16348

होत असतात. आणि या गोष्टींचा निटसा विचार झाला नाही तर ते ताण वाढतच जातात. मोनिका गजेंद्रगडकर अशा गोष्टींचा विचार करुनच कथारूपातून आविष्कृत करताना दिसतात. बऱ्याचवेळा ताण हे आई-वडील व मुले यांच्यातील वैचारिक मतभेद, मुलां-मुलांमध्ये केला जाणारा भेद, यामुळे निर्माण होत असतात.

त्यांची *संक्रमण* ही कथा आई आणि मुलगी यांच्यामध्ये निर्माण झालेला ताण, त्याला कारणीभूत असणारी परंपरा व इतर परिस्थिती याची जाणीव करुन देते. पुरुषप्रधान संस्कृतीत एकूणच स्त्रीचा दर्जा हीन मानला जातो. या कथेची नायिका रेणू परंपरागत चालत आलेल्या या संक्रमणात अडकते. मुलगी म्हणून तिला तिच्या आईकडून नेहमीच गौण लेखले जाते. ती नोकरी करुन स्वावलंबी बनते. तरीही तिचे घरातील स्थान आहे तेच राहते. स्त्री शिक्षण घेऊ लागली, नोकरी करुन कमावती झाली तरी तिचा कुटुंबातील दर्जा खालावलेलाच आहे. बऱ्याचवेळा परंपरेचा, रुढीचा पगडा असणारी एक स्त्रीचे दुसऱ्या स्त्रीच्या विकासात कसा अडथळा ठरते हे रेणूचे जीवनचित्रण पाहताना लक्षात येते. प्रतिगामी विचारांचे, बुरसटलेल्या मानसिकतेचे खंडन करण्याची धडपड ती करताना दिसते. या विचारांच्या गर्तेत, संक्रमणात सापडलेल्या आपल्या आईच्या विचारांना ती बदलू पाहते.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या 'आर्त' या कथासंग्रहातील *जन्म* ही कथा अशाच संबंधांना चितारते. कथेचा नायक सत्यजित हा सरोजवादक नाथांचा मुलगा. स्वतःच्या कलेवर निष्ठा ठेवून पैसा न मिळवता तिची जोपासना करणाऱ्या बाई आणि याउलट स्वभावाचे प्रसिद्ध सरोजवादक नाथ. या विरुद्धधर्मी स्वभावामुळे ते एकमेकापासून वेगळे होतात. शिक्षणासाठी नाथांच्या घरी रहायला गेलेल्या सत्यजितला आकर्षित करणारी मालविका. तर तिथेच त्याला मालविका आणि नाथांचे संबंध निदर्शनात येतात. ही निर्माण झालेली नात्यांची गुंतागुंत यामुळे सत्यजित नैराश्याने वेढला जातो. व त्यातूनच आत्महत्येचा प्रयत्न करतो. पती-पत्नीमधील टोकाची भूमिका, त्यामध्येच सत्यजितला वाटणारे आकर्षण आणि यातूनच वडील-मुलगा यामध्ये निर्माण झालेल्या तणावाचे चित्रण ही कथा करते.

जन्म ही कथा संगीत क्षेत्राशी जोडल्या गेलेल्या जीवनाला रेखाटते. तर त्यांची *भूप* ही कथा गायन क्षेत्राशी संबंधीत असलेल्या कौटुंबिक जीवनाला आणि ही परंपरागत कला सोडून वेगळ्या शिक्षणाला प्राधान्य देणारा मुलगा यांचे जीवनचित्रण आले आहे. गायनकला जोपासणारे अवधूतपंत आपल्या मुलालाही तेच शिक्षण देऊ इच्छितात. तर विवेकला जेनेटिक इंजिनिअर व्हायचे असते. यातून या दोघांच्यातील एक मूल्यसंघर्ष, तणाव दिसतो. विशेषतः आई-वडील व मुले यांच्यातील ताण जीवघेणे ठरु शकतात आणि हे बऱ्यावेळा मुलांच्या बाबतीत घडते. याबाबतीत या कथेचे उदाहरण देता येईल. एकमेकांतील हे ताण विकोपाला गेल्यामुळे अशा परिस्थितीला सामोरे जावे लागते तर बऱ्याचवेळा असे तणाव विकोपाला न जाता त्यांच्या जीवनात कुठेतरी मध्य साधला जातो.

जुन्या-नव्या पिढीमध्ये निर्माण होणारे ताण आतंरिक आणि बाह्य अशा दोन्ही कारणांनी तयार होतात. आतंरिक कारणामध्ये आधुनिक जीवनजाणिवा, महानगरीय संवेदनशीलता, माणसा-माणसातील नातेसंबंध येतात. तर बाह्य कारणामध्ये धार्मिकता, धर्माविषयी बाळगली जाणारी पराकोटीची श्रद्धा येते. यांच्यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या ताण वाढत जातात. याचे चित्रण *श्रद्धा* मध्ये येते तर *संक्रमण* मधील रेणू व तिची आई म्हणजे आधुनिक विचारांची तरुण पिढी आणि बुरसटलेल्या विचारांची परंपरागत पिढी यांचा संघर्ष ठरतो.

धर्माविषयी बाळगली जाणारी कडवी 'श्रद्धा' देखील अशा तणावांना जबाबदार ठरत असते. धर्माबद्दलच्या कट्टरतेतून आईवर अन्याय, अत्याचार करणारा अर्शद तर पुरोगामी विचारांची यशोदा या दोघा आई-मुलाच्यातील अंतराचे ताण याचे चित्रण लेखिका *श्रद्धा* कथेतून करतात. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथातून आधुनिक विचारांची पिढी, त्यांच्या समस्या, विचार एका बाजूला मांडतात तर परंपरानिष्ठा बाळगणारे, नीतिमूल्यांना जपणारी जुनी पिढी रेखाटून या दोन्हीमध्ये असणाऱ्या मतभेदामुळे निर्माण झालेले अंतर, ताण रेखाटतात.

६. बदलत्या सामाजिक स्थितीचे चित्रणः

साहित्यिक हा समाजामध्येच जन्मला असल्याने त्याच्या व्यक्तिमत्त्वाला समाजामध्ये आकार प्राप्त होत असतो. साहित्यिकाच्या जाणीवेत आणि नेणिवेत समाजाशी त्याची असलेली अनुकूल व प्रतिकूल नाती या ना त्या रूपात वावरत असतात. अशाच नात्यांना, नात्यातील भाव-बंधाना लेखक आपल्या साहित्यातून आविष्कृत करत असतो.

साहित्याचा कोणताही प्रकारातून समाजाचे शब्दरूप आविष्करण होत असते. मग त्या साहित्यात समाजातील व्यक्ती, त्यांचे परस्पराविषयीचे वर्तन, चालीरीती, माणसांची वैयक्तिक पार्श्वभूमी, चालीरीतींचा असणारा पगडा यांचे चित्रण होत असते. साहित्यातून माणसांचे स्वभाव, कृतीउक्ती, भावना, विचार, कल्पना याची अभिव्यक्ती होत असते. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथामधून अशा गोष्टींची अभिव्यक्ती होताना दिसते. त्यांच्या *संक्रमण* आणि *श्रद्धा* या कथेमधून या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. रेणू आणि तिची आई यांच्यामधील नवे विचार व जुने विचार यांचा संघर्ष *संक्रमण* मधून येतो. तर आपल्या अयशस्वीतेचे खापर हिंदू आईवर फोडून धर्मावर आंधळा विश्वास ठेवणारा अर्शद *श्रद्धा* या कथेतून येतो.

माणसामाणसांतील संबंधांना जसा सामाजिक मूल्यांचा संदर्भ असतो. तसाच संदर्भ व्यक्तीच्या मनोरचनेशीही असतो. एखाद्या काळात नवी असणारी गोष्ट पुढच्या काळात जुनी, टाकाऊ बनते. हे ओळखून नव्या मूल्यांनुसार ती बदलत जाणे गरजेचे असते. पण अशा बदलांचा अंगीकार जेव्हा समाज, कुटुंब किंवा कुटुंबातील व्यक्ती करत नाही तेव्हा ती परंपरेच्या संक्रमणातच अडकून पडतात. त्यांची *संक्रमण* कथा अशाच आशयाने युक्त आहे. या कथेतील रेणू *स्त्री* म्हणून कुटुंबात हीन लेखलेली. मोठ्या भावाच्या तुटपुंज्या पगारात कुटुंबाचे व्यवहार चालू शकत नाहीत तेव्हा रेणू स्वतः कमवायला लागते. पण तरीही तिचा कुटुंबातील दर्जा सुधारला जात नाही. तिचे स्वतःचे लग्न ठरणे आणि त्याच काळात लहान भाऊ मानसिक रुग्ण बनणे या गोष्टीला रेणूलाच जबाबदार धरले जाते. रेणू या पारंपरिक

समजूतीविरुद्ध बंड करुन उठते. मुलांच्याबरोबर घरातील सर्व जबाबदाऱ्या स्वतः पार पाडून आईच्या मानसिकतेचे खंडन करू पाहते आहे. या कथेमधून उच्च शिक्षण घेणाऱ्या या संगणक युगातही कुटुंबातील न बदललेला स्त्रीचा दर्जा चित्रित होतो. सध्याचा माणूस कृतीने वाढत असला तरी त्याचे विचार खुंटलेले दिसतात. किंबहुना संकुचितच दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा अजूनही व्यापक आहे. आपल्या कार्यक्षेत्राने गगनाला गवसणी घालणाऱ्या स्त्रियांचे कार्यक्षेत्र बऱ्याचवेळा *चूल आणि मूल* कसे आहे याचे विचारमंथन करायला ही कथा भाग पाडते.

धर्मावरील आत्यंतिक श्रद्धेमुळे एखादी व्यक्ती कोणत्या थराला जाऊ शकते याचे चित्रण श्रद्धा ही कथा करते. दररोजचे जीवन जगत असताना *धर्म* ही गोष्ट खूप दूर असते. किंबहुना तिचा संबंधच येत नसतो. पण अशा गोष्टींच्या अफवांना माणूस लगेच शरण जातो आणि कसा हिंस्त्र बनतो याचे चित्रण *श्रद्धा* ही कथा करते. या कथेतील अर्शदला एका पाठोपाठ येणाऱ्या अपयशातून नैराश्य येते. इतरांच्या सांगण्यावरुन तो धर्माबद्दलच्या भाकड गोष्टीतून वेगळाच अर्थ काढतो. अर्शदचे वडील मुस्लिम धर्माचे न् आई यशोदा हिंदू धर्माची. दोघेही पुरोगामी विचारांचे. सय्यदला आपला मुस्लिम धर्म प्रिय असला तरी तो यशोदावर कधीही लादत नाही. उलट तिच्या हिंदू धर्माचा पुरस्कार तो करतो. पण अर्शद मात्र स्वतःच्या अपयशाचा, उणिवांचा संबंध आईच्या हिंदू असण्याशी जोडतो. धर्माचा मन मानेल तसा अर्थ लावणाऱ्या लोकांचे विचार मानून तो धर्माबद्दलची कडवी श्रद्धा बाळगू लागतो. या गोष्टींच्या आहारी गेलेला अर्शद वडिलांच्या मृत्यूनंतर स्वतःच्या आईवर मुस्लिम धर्म स्विकारण्याची जबरदस्ती करतो.

आपल्या लेखात अनंत देशमुख म्हणतात- *धर्मश्रद्धा, मूल्यविवेक आणि पराकोटीचे अंधानुकरण व कडवा मुस्लिम धार्जिणपणा माणसाला कसा माथेफिरु बनवतो आणि वर्तनात व विचारात आक्रमकता कशी येते, एकांगी विचार करण्याची, दुसऱ्याचा अनादर करण्याची*

किंवा आपल्या विरोधात असतील त्यांचा हिस्त्रंपणे निःपात करण्याची पाशवी वृत्ती कशी बळावते याचे चित्रण ही कथा करताना दिसते.(अनंत देशमुखः जुलै २००८:५६)

अर्शदच्या या हिंस्त्रतेचे टोक खूपच विदारक होते. तो असलमशी लग्न ठरलेल्या हिंदू वनितावर अत्याचार करतो. त्याच्या असल्या गोष्टींचा परिचय आल्यानंतर दररोजच्या जगण्यात धर्म येत नाही असे वाटत असतानाच दररोजच्या चांगल्या-वाईट जगण्याशी मात्र तो कसा चिकटून असतो याची प्रचिती येते. मोनिका गजेंद्रगडकर या आपल्या कथेतून कुटुंब आणि समाज यांचे वेगवेगळे अस्तित्व भासवू दिले नसले तरी या कुटुंबाचा विचार आणि एकूणच समाजाचा, त्यातील धार्मिकतेचा विचार करायला ही कथा मात्र भाग पाडते. जिवघेण्या स्पर्धेच्या युगात तग धरायचे असेल तर पूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करावे लागतात. जर हेच प्रयत्न तरुणांच्याकडून कमी पडत गेले तर त्यांचा कल कोणत्या गोष्टींकडे वाढतो आणि त्यातून तरुण वर्गाची कशी फरपट होते हे या कथेतून निर्देशित होते. डॉ. मीना वैशंपायन म्हणतात- *श्रद्धा सारखी कथा वर्तमान प्रश्नांना खोलवर वेध घेण्याची लेखिकेची धडपड दाखवते आणि त्याचबरोबर आपल्याला अंतर्मुख व्हायला भाग पाडते.* (मीना वैशंपायन : १ फेब्रु.२००९:७)

७. अपरिचित अनुभवविश्वाचे चित्रण :

वरवर सुस्थितीत वाटणाऱ्या मानवी जीवनात अनेक भावनिक, मानसिक गुंते असतात. असे गुंते सोडविण्याचा जेवढा प्रयत्न केला जातो तेवढे ते गुंते अधिक वाढत जातात. मानवी मनःपटलावरील होणारे भावनेचे स्फोट जेवढे दाहक वाटतात त्यापेक्षाही त्याची दाहकता खूप खोल, दुःखदायी आणि वेदनांनी भरलेली असते. मानवी मनातील गुंतागुंत, बदलती नाती, त्यातील मानसिक आंदोलने महत्त्वाची ठरतात आणि मग पारंपरिक संकेतानुसार आलेल्या नात्यांना कधी वेगळीच किनार लाभते. या मानसिक आंदोलनांचे आणि बदलत्या नात्यांचे चित्रण वाचकाला वेगळ्या विश्वात घेऊन जाते. आपल्या भावना,

वेदना माणूस व्यक्त करु शकतो पण अशा गोष्टींची कमतरता असणाऱ्या मतिमंद मुलांविषयी बोलायचे झाले तर आपल्या संवेदनशीलतेला मर्यादा पडू लागतात. लहान मुलांचे जीवन चितारण्यासाठी लहान मुलांची मानसिकता, त्यांच वागणं समजून घ्यावे लागते तसेच मतिमंद मुलांच्याही वेगळ्या अशा जीवनविश्वाचा अभ्यास करुन त्यांच्या जाणिवा, भावनाही तितक्याच सूक्ष्मपणे हाताळाव्या लागतात. त्यांचे आयुष्य, वाढत्या वयाबरोबर वाढत जाणाऱ्या त्यांच्या शारीरिक आणि मानसिक वृत्ती यांना चित्रित करणे आव्हानात्मक काम असते. आणि हे आव्हान समर्थपणे मोनिका गजेंद्रगडकर यांनी *आधार* आणि *अर्थ* या कथांमधून पेललेले दिसून येते.

बऱ्याचवेळा या अनुभवांच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत आपण पोहचू शकत नाही. अशा अनुभवांना जेवढी खोली तेवढीच खोल आणि तीक्ष्ण लेखकाची संवेदनशीलता असणे गरजेचे असते. अन्यथा अशा विषयाची हाताळणी पोकळ आणि ठिसूळ अशीच होईल. पण या गोष्टींची कमतरता मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथांमधून कोठेच दिसून येत नाही. अपरिचित अशा अनुभवांना परंपरागत चौकटीत न बसणारे शरीर आणि मानसिक नाते त्या विलक्षण आणि तेवढ्याच धिटाईने कथेमध्ये हाताळतात. अवघडलेपण आणि संकोच न बाळगता अपरिचित अनुभव त्या आपल्या कथेतून मांडतात.

आधार ही कथा चित्रकार अरुण आणि मतिमंद देवेन या मामा-भाच्याची आहे. आई व बहीण यांचा अपघातात मृत्यू झाल्यानंतर देवेनचे सर्व काही करण्याची जबाबदारी अरुणवर पडते. तो चित्रे काढतो ती फक्त चरितार्थासाठी. मानसिक आनंद, नवनिर्मितीचा आनंद यातून त्याला मिळत नाही. अरुण शारीरिक आणि मानसिक पातळीवर अस्थिर असतो. त्याची ही मानसिकता देवेनच्या रूपाने स्थिर होते. पौगंडावस्थेत पदार्पण केलेला देवेन त्याच्या शारीरात होणारे बदल व्यक्त करु शकत नसला तरी त्याच्या हालचालीवरुन ते स्पष्ट होत जातात. यामुळेच अरुणचे देवेनशी शारीरिक संबंध जोडले जातात. देवेन मतिमंद असल्यामुळे या गोष्टीचा प्रतिकार मोडीत काढला जातो. पण याचे परिणाम देवेनच्या विचित्र वागण्यात होत

जातात. त्यातच तो आजारी पडतो आणि त्याचा मृत्यू होतो. एका लेखात अरुणा सबाने म्हणतात- *चित्रकार किंवा आर्टिस्ट हा विषय घेऊन आजपर्यंत अनेकांनी कथा लिहिल्या आहेत. पण 'आधार' सारखी कथा लिहून मोनिका गजेंद्रगडकरांनी आपली शक्तीस्थळं अधिक प्रभाविपणे अधोरेखित केली आहेत. या कथेचा विषय अतिशय नाजुक आहे.* (अरुणा सबाणे : जुऑस.२००८:२७)

देवेन अरुणला आधार देऊ शकत नाही असे वाटते. पण तो अरुणचा वेगळ्या प्रकारचा आधार बनतो. अरुणच्या यशाच्या मागे देवेन असतो. शारीरिक पातळीवरील व्यवहार देवेनच्या जेव्हा सहनशीलतेच्या बाहेर जातात तेव्हा मात्र तो स्वतःच्या जीवनाला पूर्णविराम देतो. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या एका लेखात म्हणतात-*काही भोगवटे जिवंतपणीच्या मरणाइतके प्रखर, उद्ध्वस्त करणारे असू शकतात. ते माणूसपणाला करपवून टाकणारे. माझ्या काही कथातून येणाऱ्या मतिमंद मुलांमधील मतिमंदता ही सामर्थ्य बनून कशी त्यांना, इतरांना जगण्याचा चिवट आधार देऊ शकतात. मतिमंद देवेन आपल्या चित्रकार मामाच्या सृजनशीलतेला शारीरिक आधार देत तीच प्रेरणा देत राहतो.* (मोनिका गजेंद्रगडकर : जुऑस.२००८:३४,३५)

मोनिका गजेंद्रगडकर यांची *अर्थ* ही कथा देखील मतिमंद मुलांचा विषय हाताळणारी पण वेगळ्या आशयाची आहे. या कथेतील विणा आणि विद्याधर आपल्या मुलीच्या मृत्यूने खूप दुःखी होतात. विद्याधर संसारातून पूर्णपणे विरक्त होतो. तर मुलीच्या मृत्यूचे दुःख सहन करत जगण्याशिवाय विणाकडे पर्यायच नसतो. याचवेळी मतिमंद शाळेतील गणेश तिचा आधार बनतो. विणाच्या जगण्याला अर्थ प्राप्त करुन देण्याचं काम गणेश करतो. या कथेमध्ये लेखिकेने मतिमंद गणेशचे वाढत्या वयातील सूक्ष्मातिसूक्ष्म हालचाली, भाव-भावनांचे विश्लेषण, त्याची मानसिकता याचे चित्रण केलेले दिसते. समाजातील अपप्रवृत्तींना गणेश बळी पडतो. रस्त्यातील गुंड गणेशला दारु पाजतात. त्याला कुठे कुठे फिरवतात. त्याच्यावर शारीरिक अत्याचार करतात. जगातील क्रुरतेचा अनुभव नसलेला निष्पाप गणेश या

घटनेनंतर कोम्यात जातो. मरता-मरता तो विणाला आयुष्याचा अर्थ सांगून जातो. त्यांची जगण्यासाठीची चाललेली विलक्षण धडपड मोनिका गजेंद्रगडकर या कथेतून चितारतात.

ग्रंथबद्ध न झालेली *जाणीव* या कथेतूनही हा विषय आला आहे. समकालीन कथेपेक्षा अपरिचित मतिमंद लहान मुलांचे भावविश्व चित्रण हा त्यांच्या कथाचित्रणाचा वेगळेपणा होय. *आधार, अर्थ* किंवा *जाणीव* या कथेतील हाताळायला कठीण असणारे विषय त्या हळुवारपणे, समंजसपणे आणि सयंमाने हाताळतात. यातच त्यांचे खूप मोठे यश आहे.

प्रस्तुत प्रकरणात मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथासाहित्यातील आशयसूत्रांचा आपण विस्ताराने विचार केला. महानगरीय जीवनाची पार्श्वभूमी त्यांच्या कथालेखनाला आहे. त्यांच्या कथाचित्रणाचा प्रदेश आहे तो महानगरीय जीवन. या महानगरातील कुटुंबसंस्था तीमधील वास्तव, ताण यांना त्यांची कथा अधोरेखित करते. दोन पिढ्यांमधला अंतराय ती सूचित करते. व्यक्तिवादी मूल्ये व परंपरानिष्ठाही ती दर्शविते. विशिष्ट पर्यावरणातील कुटुंबात स्त्रीची होणारी कुचंबणा तसेच नव्या काळात आलेले आत्मभानही त्यांची कथा साक्षात करते. मतिमंद मुलाच्या अनुभवविश्वासारख्या अनुभव विश्वाला त्यांची कथा साक्षात करते. आत्यंतिक व्यक्तिवादामुळे मोडकळीस आलेली कुटुंबपद्धती, यातून आलेले एकाकीपण, माणसाचा स्वार्थ आणि त्यामुळे नात्यामध्ये निर्माण झालेला दुरावा यांची मांडणी त्या करतात. तसेच उच्चमध्यमवर्गीय स्त्रियांचे शोषण, त्यांची कुचंबणा, पुरुषसत्ताक व्यवस्थेची अरेरावी अशा अनुभवाची विविध रूपे त्या आपल्या कथामधून मांडतात. त्या म्हणतात, *पॉल क्ले सांगत असत- कलावंत म्हणजे एक झाडच असतो. अवकाशात हात पसरुन दिसले, पण दिसणाऱ्या मुळांकडून सतत जीवनरस शोषत राहील. लेखकाला अनुभवाच्या, आयुष्याच्या भूमीत मुळं पसरावी लागतात. तरच लिहिता येतं.*(मोनिका गजेंद्रगडकरः आक्टो२००८:२२) अशाच विविध अनुभवांची संवेदनशील जाणीव आणि ती प्रकट करणारी त्यांची शैली यामुळे त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संदर्भ सूची :-

१. गजेंद्रगडकर, मोनिका२००८. *माझे कथालेखन,* साक्षात, औरंगाबादः जुऑस.२००८.

२. गजेंद्रगडकर, मोनिका२००८. *शापमुक्तीसाठी लिहिते,* तनिष्का, पुणे : ऑक्टो२००८.

३. गजेंद्रगडकर, मोनिका२००९. *मुलाखत,* मुंबईः डिसेंबर२००९.

४. देशमुख, अनंत२००८. *आर्त : मोनिका गजेंद्रगडकर,* ललित, मुंबई :जुलै२००८.

५. नाईक, सुभाष२००५. *नातेसंबंधाचा वेध घेणाऱ्या लक्षणीय कथा,* (पुस्तक परिचय), दै.प्रभात, पुणे : दि.६मार्च२००५.

६. बळेल, अनिल २००८. *साहित्य कल्लोळ,* साधना, पुणे : जाने.२००८.

७. भवाळकर, तारा२००५. *अपेक्षा वाढवणारा कथासंग्रह,* दै.तरुण भारत, बेळगाव : रविवार ३०जाने.२००५.

८. राऊत, कमलाकर२००८. *अंतर्मुख करणाऱ्या कथा,* दै.लोकसत्ता, जुलै२००८.

९. वैशंपायन, मीना२००९. *अंतर्मुख करणाऱ्या कथा,* दै.प्रहार, मुंबई : १ फेब्रु २००९.

१०. सबाणे अरुणा(संपा)२००८. *अलीकडच्या कथालेखिका,* साक्षात, औरंगाबाद : जुऑस.२००८.